
पद्यपाठ २

**अभंगवाणी  संत तुकाराम**

ठळक मुद्दे




संत तुकाराम महाराजांविषयीची माहिती येथे वाचा-

https://mr.wikipedia.org/wiki/%E0%A4%A4%E0%A5%81%E0%A4%95%E0%A4%BE%E0%A4%B0%E0%A4%BE%E0%A4%AE

तुकाराम महराजांचे अभंग येथे ऐका-

http://www.aathavanitli-gani.com/Santvani/Sant_Tukaram

**१.संत तुकाराम** वारकरी संप्रदायातील संत तुकाराम महाराज यांचे अभंग तुम्ही ऐकले असतील. संत तुकारामांचे मन सतत विठ्ठलाच्या पायी गुंतलेले होते. विठ्ठलाच्या दर्शनासाठी त्यांचे मन आसुसलेले होते. विठ्ठलावरील आत्यंतिक भक्तीतून त्यांनी अभंग लिहिले आणि ते अजरामर झाले. त्यांच्या अभंगांचे इंग्लिशमधूनही  भांषांतर झाले आहे. त्यांच्या कवित्वाला, भक्तीच्या उत्कटतेला जगन्मान्यता मिळाली आहे. त्यांच्या अभंगांचा विचार करताना तत्त्वज्ञान सोपे होऊन सर्वसामान्य माणसांच्या समोर येते, आपल्या आवाक्यात असल्यासारखे वाटते. भक्त ते साक्षात्कारी संत हा त्यांचा प्रवास त्यांच्या अभंगातून अभ्यासता येतो. ते पारमार्थिक तत्त्वज्ञान सांगत असले तरी आपल्याला रोजच्या जीवनातही ते आवश्यक व उपयुक्त कसे ठरते, ते त्यांच्या अभंगातून पाहू या.

**२.अभंग १**

या अभंगांचा विचार आपण दोन प्रकारे करू या.

अभंगांमधून व्यक्त होणारा अर्थ

अभंगांतून दिसून येणारे संत तुकाराम महाराजांचे व्यक्तिमत्वाचे विशेष, त्यांची भाषाशैली

त्यासाठी प्रथम एकेक अभंग ऐकू या.

**ओले मूळ भेदी खडकाचे अंग | अभ्यासासी सांग कार्यसिद्धी ||१||**

**नव्हे ऐसे काही अवघड | नाही कईवाड तोच वरी||**

**दोरे चिरा कापे पडिला काचणी | अभ्यासे सेवनी विष पडे ||२||**

**तुका म्हणे कैचा बैसण्यासी ठाव | जठरी बाळा वाव एकाएकी ||३||**

**अभंग १**

**खडक फोडण्याचे सामर्थ्य ओल्या झाडाच्या मुळात असते. सतत अभ्यास म्हणजे प्रयत्न केल्यास आपले कार्य पूर्णत्वास जाते.(१)**

**कोणतीही गोष्ट अवघड नाही. प्रयत्न केले तर ती साध्य होते. दगडावर आपण दोरा जरी सतत एकाच जागी घासला तर दगडाला चिरा म्हणजे भेग पाडू शकतो, तो कापला जाऊ शकतो. सतत थोडे थोडे विष घेतले तर कालांतराने ते पचनी पाडण्याचेही सामर्थ्य येते.(२)**

**तुकाराम महाराज म्हणतात, नुसते बसून राहण्यात काय अर्थ? आईच्या उदरात असलेले बाळही आपल्या वाढीसाठी जागा करू शकते.(३)**

**अभंगातील शिकवण**

माणसाचे जीवन कायम सुरळीत चालेल असे सहसा घडत नाही. तेव्हा निराश न होता सतत त्या गोष्टीचा पाठपुरावा केला, प्रयत्न केले ,तर यश आपल्यापासून  दूर जात नाही. जे अशक्य वाटते तेही कसे शक्य होऊ शकते ते संत तुकाराम उदाहरणे देऊन आपल्या मनावर ठसवितात. परिस्थितीचे आव्हान स्वीकारणे, त्या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी विविध प्रयत्नांची शिकस्त करणे, आणि त्यानंतर मिळणारा आनंद घेणे हेच जीवनात घडावे.

ओल्या मुळासारखी कोमल गोष्ट जर दगडासारख्या कणखर /टणक वस्तूला भेदू शकते तर अभ्यासाने प्रयत्नाने काम सिद्ध होणारच.अवघड असे आयुष्यात काहीच नसते.

असाच विचार अनेक साहित्यिकांनी वेळोवेळी, वेगवेगळ्या संदर्भात आणि वेगवेगळ्या पद्धतीने व्यक्त केला आहे. संदर्भ साहित्यात त्याचे कांही नमुने दिले आहेत, ते वाचा. संत तुकारामांच्या अभंगान्तील विचार त्याच्याशी कसे जुळतात ते पाहा.

**स्वाध्याय-**

**उजळणी/सराव प्रश्न**

१. खालील काव्यपंक्तींचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

अ. ओलें मूळ भेदी खडकाचें अंग |अभ्यासासी सांग कार्यसिद्धी |

**मुक्त प्रश्न**

२.संत रामदास यांचे पुढील अभंग वाचा.पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३० ते ४० शब्दांत लिहा.

**'प्रयत्नांती परमेश्वर' याचा अर्थ आता तुम्हाला नक्कीच माहिती असणार. काही विचार आपले जीवन सुखी करण्यासाठी कायम स्वरूपी महत्वाचे असतात. त्या विचारांचा उच्चार अनेक वेळा अनेकांनी केलेला आहे. असे विचारांचे साम्य संतांच्या काव्यात आढळते. संत तुकाराम महाराज यांनी प्रयत्नांचे महत्व कसे सांगितले ते तुम्ही त्यांच्या अभंगात वाचले. आता संत रामदास यांचा एक नमुना वाचा.**

**प्रयत्नांचे महत्व सांगताना संत रामदास म्हणतात-**

**कष्टेंवीण फळ नाहीं|कष्टेंवीण राज्य नाहीं|केल्यावीण होत नाहीं|साध्य जनीं||३||**

**आळसें काम नासतें|हें तों प्रत्ययास येतें|कष्टाकडे चुकावितें|हीन जन||४||**

**आधीं कष्टाचें दु:ख सोसिती|ते पुढें सुखाचें फळ भोगिती|आधीं आळसें सुखावती|त्यां पुढे दु;ख||५||**

(सार्थ श्रीदासबोध; दशक १८, समास ७; ओव्या क्र. ३,४,५; पृ.क्र.६७६; संपादक व अनुवादक ह.भ.प. ल. रा. पांगारकर,११ वी आवृत्ती, केशव भिकाजी ढवळे प्रकाशन, मुंबई )अ.संत तुकाराम महाराज आणि संत रामदास यांच्या विचारात कोणते साम्य आहे?

ब. दोन्ही संतांचे कालखंड भिन्न होते, तरीही त्यांच्या विचारांचे महत्व आजही तितकेच जाणवते. या बद्दल तुमचे विचार लिहा.

क.कल्पनाविस्तार करा- प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे|

ड. तुमचा मित्र नेहमी प्रयत्नात कमी पडायचा. पण एका स्पर्धेत मात्र त्याने विशेष प्राविण्य संपादित केले. त्याने प्रयत्नांची शिकस्त करावी यासाठी त्याला मित्रत्वाच्या नात्याने पत्र लिहा.

इ. तुमचा मित्र नेहमी प्रयत्नात कमी पडायचा. पण एका स्पर्धेत मात्र त्याने विशेष प्राविण्य संपादित केले. त्याने या संदर्भात केलेले प्रयत्न तुम्हाला विशेष जाणविले. याची बातमी तुमच्या शाळेच्या मासिकासाठी तयार करा.